**<u>सं.फौ.ख.क्र.१११९/२०२४</u>**
शासन–वि–परशुराम हिले.
नि.क्र.८ लगत.

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. २ यांची जबानी</u>**

मी याद्वारे सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,
नाव – आशा अशोक जंगले,
वय – ३४ वर्षे, व्यवसाय – गृहिणी,
राहणार– गट क्र. ५, एसआरपीएफ कॅम्प, ता. दौंड, जि. पुणे.

**<u>सरतपासणी अभियोग पक्षातर्फे विद्वान सहा. सरकारी अभियोक्ता श्री. एस. पी. आधंळे यांच्यामार्फत शपथेवर सुरुः–</u>**

१. आरोपी माझे सख्खे मेव्हुणे लागतात. दि. १६.०३.२०२४ रोजी संध्याकाळी ७.०० वाजता काय घटना घडली याची मला माहिती नाही. आरोपीकडून फायरींग झाल्याबाबत मी माझ्या भावाला कळविले असे काही घडले नव्हते. दि. २१.०३.२०२४ रोजी मी पोलीसांकडे जबाब नोंदविण्यासाठी गेले होते. पोलीसांनी माझ्या सांगण्याप्रमाणे जबाब नोंदविला असे काही घडले नाही.

**<u>साक्षीदार अभियोग पक्षास पाठिंबा देत नसल्याचे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी नमुद केले व साक्षीदारास उलटतपासणी सदृष्य प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली, परवानगी देण्यात आली.</u>**

२. हे म्हणणे खरे नाही की, दि. १६.०३.२०२४ रोजी मला माझी बहिण आशा हिचा फोन आला की, तिच्या पतीच्या हाते फायरींग झालेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, बहिणीच्या घरी गेल्यावर मी पाहिले की, तेथे पुंगळी पडलेली होती व माझे दाजी दारुच्या नशेत दिसून आले. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझ्या जबाबातील **<u>आधोरेकित भाग ब</u>** चा मजकूर मी सांगितल्याप्रमाणे पोलीसांनी नोंदवून घेतला होता व तो खरा व बरोबर आहे. हे म्हणणे खरे नाही की, मेव्हुण्याला वाचवण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**<u>सरतपास पुर्ण.</u>**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. एम. जे. के. शेख यांनी नाकारला.</u>**

श्रवणोत्तर स्विकृत. समक्ष

Sd/–

**[ श्रीमती एस. ए. विराणी ]**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, दौंड, जि. पुणे.

दिनांकः– १२.०६.२०२५